RNI No. MAHBIL/2009/35529

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग एक-कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ९, अंक ७] गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी १६-२२, २०२३/माघ २७-फाल्गुन ३, शके १९४४ [पृष्ठे १६ किंमत रुपये : १४.००

### प्राधिकृत प्रकाशन

### शासकीय अधिसूचना, नेमणुका इत्यादी

### नगरविकास विभाग

४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ फेब्रुवारी, २०२३.

### अधिसूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक टीपीएस-१९२३/१/प्र.क्र.१/२३/नवि-१२.— ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७) (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) चे कलम ४० चे उप-कलम (१) नुसार शासन, नगरविकास विभागाचे अधिसूचना क्र.सीआयडी/१९८९/५०८/सीआर-८०/८९/नवि-१०, दिनांक २९ मार्च १९८९ अन्वये त्यासोबतचे अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मौ.औरस (बु.), रानबांबुळी व आनाव या गावातील क्षेत्रासाठी (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिसूचित क्षेत्र " असा करण्यात आला आहे.) शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित, महाराष्ट्र (सिडको) ची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त विशेष नियोजन प्राधिकरण " असा करण्यात आला आहे.) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विशेष नियोजन प्राधिकरणाच्या क्षेत्रासाठीचे नियोजन प्रस्ताव उक्त अधिनियमाचे कलम ४० मधील तरतुदीनुसार शासन नगरविकास विभागाची अधिसूचना क्र.सीआयडी/१९९२/४९३/प्र.क्र.९२/नवि-१०, दिनांक १३ नोव्हेंबर १९९२ अन्वये मंजूर केले आहे.(यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त नियोजन प्रस्ताव " असा करण्यात आला आहे.) ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम १२३ चे उप-कलम (१) मधील तरतुदीनुसार शासन नगरविकास विभागाची अधिसूचना क्र. टीपीएस-१९९७/अनौसं ६६/प्र.क्र.८७(I)/९७/नवि-१२, दिनांक २ एप्रिल, १९९८ अन्वये मौ.ओरोस (बु.), मौ.रानबांबुळी व मौ. आनाव, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथील क्षेत्र नवीननगर म्हणून निर्देशित केले आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त नवनगर " असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, शासन नगरविकास विभागाची अधिसूचना क्र. टीपीएस-१९९७/अनौसं ६६/प्र.क्र.८७(II)/९७/नवि-१२, दिनांक २ एप्रिल, १९९८ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम ११३ मधील उप-कलम (२) सह (७) मधील तरतुदीनुसार उक्त नवनगराकरिता सिंधुदुर्गनगरी नवनगरविकास प्राधिकरणाची स्थापना केली आहे (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त प्राधिकरण " असा करण्यात आला आहे.) ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्रस्तावामधील मौजे-ओरोस (बु.), तालुका-कुडाळ, जिल्हा-सिंधुदुर्ग येथील भूखंड क्र. ८३ एकूण क्षेत्र १३.३७० हेक्टर आर " ऑरचर्ड " या प्रयोजनासाठी आरक्षित असून (यापुढे जिचा उल्लेख " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे.) संचालक सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योग, मंत्रालय, भारत सरकार, कुर्ला, मुंबई यांनी दिनांक १९ जुलै २०२२ रोजीच्या पत्रान्वये उक्त जमिनीपैकी ८.०० हेक्टर आर क्षेत्र " तंत्रज्ञान केंद्र (प्रशासकीय) " यासाठी आरक्षित करण्याची मागणी उक्त प्राधिकरणाकडे केली आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त प्रस्ताव " असा करण्यात आला आहे.) ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्राधिकरणाने उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) अन्वयेची सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करून उक्त जमिनीपैकी अंदाजे ८.०० हे. क्षेत्र " ऑरचर्ड " मधून वगळून " तंत्रज्ञान केंद्र (प्रशासकीय) " याकरिता ठेवणेबाबतचा फेरबदल प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी दिनांक २२ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या पत्रान्वये सादर केला आहे (यापुढे ज्याचा उल्लेख " प्रस्तावित फेरबदल " असा करण्यात आला आहे.) ;

आणि ज्याअर्थी, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर व संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर उक्त प्रस्तावित फेरबदल अटीस अधीन राहून मंजूर करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे.

आणि त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे पोट-कलम (२) अन्वये व त्याअनुषंगाने शासनास प्राप्त असलेल्या इतर अधिकारांचा वापर करून शासन याद्वारे :—

(अ) सिंधुदुर्गनगरी नवनगरविकास प्राधिकरणाच्या अधिसूचित क्षेत्रामधील उक्त प्रस्तावित फेरबदल अटीसापेक्ष मंजूर करीत आहे आणि त्यासाठी उक्त नियोजन प्रस्तावाच्या मंजुरीच्या अधिसूचनेतील फेरबदलाच्या अनुसूचिमध्ये शेवटच्या नोंदीनंतर पुढील नवीन नोंद समाविष्ट करण्यात येत आहे ;

**नोंद**

" सिंधुदुर्गनगरी नवनगरविकास प्राधिकरणाच्या अधिसूचित क्षेत्राच्या मंजूर नियोजन प्रस्तावामधील मौजे ओरोस (बु.) येथील आरक्षित भूखंड क्र. ८३- " ऑरचर्ड " क्षेत्र १३.३७० हे.आर. पैकी सोबतच्या भाग नकाशावर दर्शविल्याप्रमाणे ८.०० हे.आर. क्षेत्र भूखंड क्र. ८३ मधून वगळण्यात येत आहे व सदरचे वगळलेले क्षेत्र आरक्षण क्र.८३अ- " तंत्रज्ञान केंद्र (प्रशासकीय) " या आरक्षणाकरिता खालील नमूद अटीसापेक्ष मंजुरी देत आहे.

**अटी :-**

(१) प्रस्तूत फेरबदलाखालील जागेवर मोठ्या प्रमाणात झाडेझुडपे असल्याने, प्रस्तुत जागेवर विकास करताना अस्तित्वातील झाडांची कमीतकमी हानी होईल या पद्धतीने विकास करणे आवश्यक राहील.

(२) प्रस्तूत फेरबदलाखालील जागेमधून जाणारे नैसर्गिक जलप्रवाह अबाधित ठेवणे आवश्यक राहील व भूखंडामधील उर्वरित ५.३७० हे. आर क्षेत्र " ऑरचर्ड " म्हणून भविष्यात कायम ठेवणे प्राधिकरणावर बंधनकारक राहील.

(३) प्रस्तूत फेरबदलाखालील जागेपैकी किमान १०% क्षेत्रावर मियावाकी पद्धतीचे वन विकसित करणे आवश्यक राहील.

(४) प्रस्तूत फेरबदलामुळे भूखंड क्र. ८३ मधील उत्तर-पूर्व बाजूकडील शिल्लक राहणाऱ्या क्षेत्राकरिता फेरबदलाखालील जमिनीमधून आवश्यक रुंदीचा पोहचमार्ग देणे बंधनकारक राहील.

(ब) सदरची अधिसूचना **शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

(क) सदरची अधिसूचना आणि प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी ठेवण्यात आली आहे.

(१) विभागीय आयुक्त कोकण विभाग, नवी मुंबई.

(२) सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई.

(३) जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग.

(४) सहायक संचालक नगररचना, सिंधुदूर्ग शाखा, सिंधुदूर्ग.

(५) मुख्य कार्यकारी अधिकारी, सिंधुदुर्गनगरी नवनगरविकास प्राधिकरण, सिंधुदुर्ग.

सदरची अधिसूचना ही महाराष्ट्र शासनाच्या *www.mahrashtra.gov.in* (कायदे व नियम) या संकेतस्थळावर देखिल उपलब्ध करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पु. म. शिंदे,**
कार्यासन अधिकारी.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

4th Floor, Main Building, Mantralaya, Mumbai 400 032, dated 2nd February, 2023.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. TPS-1222/396/C.R.93/22/UD-12.— Whereas,the City and Industrial Development Corporation (CIDCO) had been appointed as the Special Planning Authority (hereinafter referred to as the " said Special Planning Authority ") under the provisions of sub-section (*1*) of section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra XXXVII of 1966) (hereinafter referred to as " the said Act ") for the area of villages Oras (Bk.), Ranbambuli and Anav Tal.Kudal, Dist. Sindhudurg as described in the schedule, by the Government of Maharashtra *vide* Urban Development Department Notification No.CID/1989/508/C.R.80/89/UD-10, dated the 29th March 1989 ;

And whereas, the Planning Proposal of the said Special Planning Authority has been sanctioned by the Government in the Urban Development Department, under section 40 of the said Act *vide* Notification No. CID/1992/ C.R.92 / UD-10, dated the 13th November 1992 (hereinafter referred to as the " said planning proposals ") ;

And whereas, the Government in the Urban Development Department Notification No. TPS. 1997/UOR- 66/C.R.8701/97/ UD-12, dated the 2nd April 1998 under sub-section (*1*) of section 113 of the said Act, has designated the area from villages Oras (Bk.), Ranbambuli and Anav, Tal Kudal, Dist. Sindhudurg as Sindhudurg Nagari New Town (hereinafter referred to as the " said New Town ") ;

And whereas, the Government in the Urban Development Department Notification No. TPS. 1997/UOR-66/C.R.87(IIV)97/ UD-12, dated the 2nd April 1998 under sub-section (*2*) read with sub-section (*7*) of section 113 has constituted the Sindhudurg Nagari New Town Development Authority for the said New Town (hereinafter referred to as " the said Authority ") ;

And whereas, plot No.83 of Village-Oros (Bk.) Taluka-Kudal, Dist.-Sindhudurg, area admeasuring 13.370 Ha.Are in the said planning proposal is reserved for " Orchard " (hereinafter referred to as " the said land ") ; and The Director,Ministry of Government of india,Micro, Small and Medium Scale Industries, Kurla, Mumbai *vide* letter dated 19th July 2022 has requested to the said Authority for Modification of 8.00 Ha of the said land for the purpose of " Technology Centre (Administration). " (hereinafter referred to as " the said proposal ") ;

And Whereas,the said authority after following the legel procedure under sub-section(*1*) of section 37 of the said act, and has submitted a proposal for Modification in the said land about 8.00Ha.Are area deleted from " Orchard " and to reserve for " Technology Centre (Administration) " *vide* letter dated 22nd November 2022 for the approval of the Government ( hereinafter referred to as " the said proposed modification ") ;

And whereas, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that, it is necessary to sanction the said proposal with some condition.

Now therefore, in exercise of the power conferred under sub-section (*2*) of section 37 of the said Act,and all other powers enabling it in that behalf , the state Government hereby :—

(A) Sanction the said Proposed Modification in the Notified area of the Sindhudurg Nagari New Town Development Authority with condition as described below, in the schedule of modification appended with the said notification of the said planning proposals after the last entry the following new entry shall be inserted *viz* :–

***Entry***

" An area admeasuring about 8.00 Ha.Are is deleted from the reservation of Plot No. 83 " Orchard " (total area 13.370 Ha.Are) of Village Oros (Bk.) Taluka-Kudal, Dist.-Sindhudurg and is reserved for Plot No.83A " Technology Centre (Administration) " as shown on the plan of sanctioned planning proposals of the Sindhudurg Nagari New Town Development Authority subject to the following conditions :–

**Conditions :–**

(*i*) As the site under modification is heavily vegetated, hence development on the site should be done with the minimum damage of existing trees.

(*ii*) It will be necessary to preserve the natural water flows passing through the site under modification and the remaining area 5.370 Ha.Are area of the plot No. 83 will be mandated to binding on the said authority to be maintained as an " Orchard " in future.

(*iii*) At least 10% of the area under modification will be necessary to develop Miyawaki forest.

(*iv*) It will be necessary to provide an access road of required width through the land under modification to the remaining area of North-East side of plot No. 83.

(B) Fixes the date of publication of this Notification in the *Government Gazette* as the date of coming into force of this notification.

(C) A Copy of the Notification and Part plan showing Sanctioned Modification shall be made available for inspection for the general public during office hours on all working days at the following offices for a period of one month :–

(1) The Divisional Commissioner, Konkan Division, Konkan Bhavan, Navi Mumbai.

(2) The Joint Director of Town Planning, Konkan Division, Konkan Bhavan, Navi Mumbai.

(3) The Collector, Sindhudurg.

(4) The Assistant Director of Town Planning, Sindhudurg Branch, Sindhudurg.

(5) The Chief Executive Officer, Sindhudurg Nagari New Town Development Authority, Sindhudurg.

This Notification shall also be made available on the Government website at *www.maharashtra.gov.in* (Acts and Rules).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. M. SHINDE,
Section Officer.

## नगरविकास विभाग

४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ फेब्रुवारी, २०२३.

## अधिसूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक टिपीएस-१२२१/२२७३/प्र.क्र.१४१/२२/नवि-१२.— ज्याअर्थी, ठाणे शहराची सुधारित विकास योजना (यापुढे जिचा उल्लेख " उक्त विकास योजना " असा करण्यात आला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) च्या कलम ३१(१) अन्वये शासन नगरविकास विभागाची अधिसूचना क्रमांक टिपीएस-१२९७/१३१९/प्र.क्र.१४८/९७/नवि-१२, दिनांक ४ ऑक्टोंबर, १९९९ (यापुढे जिचा उल्लेख " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) अन्वये भागशः मंजूर झाली असून, ती दिनांक २२ नोव्हेंबर १९९९ पासून अंमलात आली आहे आणि उक्त विकास योजनेच्या वगळलेल्या भागाची विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम ३१(१) मधील तरतुदीनुसार शासन, नगरविकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-१२०१/२७४/प्र.क्र.२८/२००९/नवि-१२, दिनांक ३ एप्रिल २००३ रोजी मंजूर झाली असून दिनांक १४ मे, २००३ पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेच्या सेक्टर-४ च्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे माजिवडा येथील स.नं.३१८(पै), ३१९(पै), ३२१(पै) हे भूखंड रहिवास विभागात समाविष्ट आहेत व एचसीएमटीआरची आखणी दर्शविण्यात आली आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त विकास योजना प्रस्ताव " असा करण्यात आला आहे.);

आणि ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिकेने (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त महानगरपालिका " असा करण्यात आला आहे) उक्त अधिनियमातील कलम ३७(१) अन्वयेची सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून, ठाणे महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या सुविधा भूखंडास पोहोच मार्ग दर्शविण्याकरिता, उक्त विकास योजना प्रस्तावामधील स.नं. ३१८(पै), ३१९(पै), ३२१(पै) या भूखंडामधून व एचसीएमटीआरच्या आखणीमधून २०.०० मी. रुंदीचा विकास योजना रस्ता दर्शविण्याचा फेरबदल प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी दिनांक ४ ऑक्टोबर २०२१ च्या पत्रान्वये सादर केला आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख " प्रस्तावित फेरबदल " असा करण्यात आला आहे);

आणि ज्याअर्थी, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर व संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर प्रस्तावित फेरबदल अटीसापेक्ष मंजूर करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे;

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम ३७ चे पोटकलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने शासनास प्राप्त असलेल्या इतर अधिकारांचा वापर करून शासन उक्त विकास योजनेतील प्रस्तावित फेरबदल अटीसापेक्ष मंजूर करीत आहे आणि त्यासाठी उक्त विकास योजना मंजूरीच्या अधिसुचनेतील फेरबदलाच्या अनुसूचीमध्ये शेवटच्या नोंदीनंतर पुढील नवीन नोंद समाविष्ट करण्यात येत आहे;

### नोंद

" विकास योजना भाग नकाशात दर्शविल्याप्रमाणे, सेक्टर क्र. ४ च्या मंजूर विकास योजनेमधील मौ.माजिवडा येथील स.नं.३१८(पै) या भूखंडाच्या विकसनामधून ठाणे महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या दोन सुविधा भूखंड एकमेकांना जोडण्याकरिता १२.०० मी. रुंद रस्ता कायमस्वरुपी देण्याच्या अटीसापेक्ष मौ.माजिवडे येथील स.नं.३१८(पै), ३१९(पै), ३२१(पै) या रहिवास विभागातील भूखंडामधून व एचसीएमटीआरच्या आखणीमधून २०.०० मी. रुंद विकास योजना रस्ता दर्शविण्यात येत आहे. "

**२.** सदरचा मंजूर फेरबदल ही अधिसूचना **शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनाकांपासून अंमलात येईल.

**३.** उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी खाली नमूद कार्यालयामध्ये एक महिन्याच्या कालावधीकरिता उपलब्ध करण्यात यावी.

(१) आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

(२) सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी-मुंबई.

(३) सहायक संचालक, नगररचना, ठाणे शाखा, जि. ठाणे.

**४.** सदर फेरबदलाची अधिसूचना ही महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर देखील उपलब्ध करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पु. म. शिंदे,**
कार्यासन अधिकारी.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

4th Floor, Main Building, Mantralaya, Mumbai 400 032, dated 7th February, 2023.

*NOTIFICATION*

Maharashtra Regional and Town planning Act, 1966.

No. TPS-1221/2273/C.R.141/22/UD-12.— Whereas, the Revised Development Plan of the city of Thane (hereinafter referred to as “ the said Development Plan ”) has been sanctioned partly by the Government in the Urban Development Department, under Section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as “ the said Act ”) *vide* Notification No. TPS-1297/1319/CR-148/97/UD-12, dated the 4th October, 1999 (hereinafter referred to as “ the said Notification ”) and has come into force with effect from 22nd November 1999 and the Excluded Part of the said Development Plan has been sanctioned by the Government in Urban Development Department under section 31(*1*) of the said Act, *vide* Notification No. TPS-1201/274/CR-28/2009/UD-12, dated the 3rd April, 2003 and has come into force with effect from 14th May, 2003 ;

And whereas, in the said Development Plan of Sector-4, land bearing S.No.318(pt), 319(pt) and 321(pt) of Village Majiwada is included in Residential Zone and the alignment of HCMTR is shown in the said Development Plan (hereinafter referred to as “the said Development Plan proposal”);

And whereas, Thane Municipal Corporation (hereinafter referred to as “ the said Municipal Corporation”), after following the legal procedure under sub-section (*1*) of Section 37 of the said Act, has submitted a proposal for modification in the said Development Plan so as to incorporate a 20.00 mt. wide road through the land bearing S.No.318(pt), 319(pt), 321(pt) and HCMTR alignment, for the Amenity Plot of the said Municipal Corporation to the Government, *vide* letter dated 4th October 2021 (hereinafter referred to as “the Proposed Modification”);

And whereas, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that it is necessary to sanction the Proposed Modification with condition.

Now therefore, in exercise of the powers conferred under sub-section (*2*) of Section 37 of the said Act and all other powers enabling it in that behalf, the State Government hereby sanctions the Proposed Modification with condition as described below:-

“In the Schedule of modifications appended with the said Notification, after the last entry, the following new entry shall be inserted *viz.* :–

**ENTRY**

*“ A 20.00 mt. wide Development Plan Road is shown in the land bearing S.No.318(pt), 319(pt) and 321(pt) of Village Majiwada and in the alignment of HCMTR as shown on the part plan of the Development Plan, subject to condition of providing permanent 12.00 mt. wide road for connecting two Amenity Plots obtained to the Thane Municipal Corporation through the development of land bearing S.No.318(pt), ”*

**2.** The date of publication of this Notification in the *Maharashtra Government Gazette* is fixed as the date of coming into force of this sanctioned modification.

**3.** The Part Plan of aforesaid sanctioned modification shall be made available for inspection by the general public during office hours on all working days at the following offices for a period of one month :–

(*i*) The Commissioner, Thane Municipal Corporation, Thane.

(*ii*) The Joint Director of Town Planning, Konkan division, Konkan Bhavan, Navi Mumbai.

(*iii*) The Assistant Director of Town Planning, Thane Branch, Thane.

**4.** This notification shall also be made available on the Government Website at *www.maharashtra.gov.in*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. M. SHINDE,
Section Officer.

## नगरविकास विभाग

४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ फेब्रुवारी २०२३.

### अधिसूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक टीपीएस-१२२२/१५९०/प्र.क्र.१०४/२२/नवि-१२.— ज्याअर्थी, ठाणे शहराची सुधारित विकास योजना (यापुढे जिचा उल्लेख " उक्त विकास योजना " असा करण्यात आला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) च्या कलम ३१(१) अन्वये शासन नगरविकास विभागाची अधिसूचना क्रमांक टीपीएस-१२९७/१३१९/प्र.क्र.१४८/९७/नवि-१२, दिनांक ४ ऑक्टोबर, १९९९ (यापुढे जिचा उल्लेख " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) अन्वये भागशः मंजूर झाली असून, ती दिनांक २२ नोव्हेंबर १९९९ पासून अंमलात आली आहे आणि उक्त विकास योजनेच्या वगळलेल्या भागाची विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम ३१(१) मधील तरतुदीनुसार शासन, नगरविकास विभागाची अधिसूचना क्र. टीपीएस-१२०१/२७४/प्र.क्र.२८/२००९/नवि-१२, दिनांक ३ एप्रिल २००३ रोजी मंजूर झाली असून दिनांक १४ मे २००३ पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेच्या सेक्टर-८ च्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे कळवा येथील स.नं.९४(पै), ९६(पै), ९७(पै), ९८(पै), ९९(पै), १००(पै), या जमिनी (क्षेत्र सुमारे ०.६८ हेक्टर) आ.क्र.५-बस स्टेशनकरिता आरक्षित आहेत. (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त आरक्षण " असा करण्यात आला आहे.) ;

आणि ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिकेने (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त महानगरपालिका " असा करण्यात आला आहे) उक्त अधिनियमातील कलम ३७(१) अन्वयेची सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून उक्त आरक्षणाचे नामाभिदान " खेळाचे मैदान " याप्रमाणे करणेचा फेरबदल प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी दिनांक १ नोव्हेंबर २०२१ च्या पत्रान्वये सादर केला आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख " प्रस्तावित फेरबदल " असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर व संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर प्रस्तावित फेरबदल अटीसापेक्ष मंजूर करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे ;

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम ३७ चे पोट-कलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने शासनास प्राप्त असलेल्या इतर अधिकारांचा वापर करून शासन उक्त विकास योजनेतील प्रस्तावित फेरबदल अटीसापेक्ष मंजूर करीत आहे आणि त्यासाठी उक्त विकास योजना मंजुरीच्या अधिसूचनेतील फेरबदलाच्या अनुसूचीमध्ये शेवटच्या नोंदीनंतर पुढील नवीन नोंद समाविष्ट करण्यात येत आहे ;

### नोंद

" ठाणे शहराच्या सेक्टर-८ च्या मंजूर विकास योजनेमधील " आ.क्र.५-बस स्टेशन " या आरक्षणाचे नामाभिदान खालील अटीसापेक्ष " खेळाचे मैदान " याप्रमाणे करण्यात येत आहे. "

**अट**– मौ.कळवा येथील स.नं. ९९ पैकीची जमीन कोर्ट रिसिव्हर यांचे ताब्यात असल्याने या जमिनीबाबत मा. न्यायालयाचा निर्णय अंतिम राहील.

**२.** सदरचा मंजूर फेरबदल ही अधिसूचना **शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनाकांपासून अंमलात येईल.

**३.** उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी खाली नमूद कार्यालयामध्ये एक महिन्याच्या कालावधीकरिता उपलब्ध राहील.

(१) आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

(२) सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

(३) सहायक संचालक, नगररचना, ठाणे शाखा, जि. ठाणे.

**४.** सदर फेरबदलाची अधिसूचना ही महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर देखील उपलब्ध करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पु. म. शिंदे,**
कार्यासन अधिकारी.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

4th Floor, Main Building, Mantralaya, Mumbai 400 032, dated 7th February, 2023.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. TPS-1222/1590/C.R.104/22/UD-12.— Whereas, the Revised Development Plan of the city of Thane (hereinafter referred to as " the said Development Plan ") has been sanctioned partly by the Government in the Urban Development Department, under section 31(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as " the said Act ") *vide* Notification No. TPS-1297/1319/CR-148/97/UD-12, dated the 4th October, 1999 (hereinafter referred to as " the said Notification ") and has come into force with effect from 22nd November 1999 and the Excluded Part of the said Development Plan has been sanctioned by the Government in Urban Development Department under section 31(*1*) of the said Act, *vide* Notification No. TPS-1201/274/CR-28/2009/ UD-12, dated the 3rd April, 2003 and has come into force with effect from 14th May, 2003 ;

And whereas, in the said Development Plan of Sector-8, land bearing S.No.94(pt), 96(pt), 97(pt), 98(pt), 99(pt), 100(pt) (area approx.0.68 H.Are.) of village Kalwa are reserved for Site No-5-Bus Station (hereinafter referred to as "the said reservation");

And whereas, Thane Municipal Corporation (hereinafter referred to as " the said Municipal Corporation"), after following the legal procedure under sub-section (*1*) of section 37 of the said Act, has submitted a proposal for modification in the said Development Plan so as to change the designation of the said reservation to Play Ground, to the Government *vide* letter dated 1st November 2021 (hereinafter referred to as "the Proposed Modification");

And whereas, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that it is necessary to sanction the Proposed Modification with condition.

Now therefore, in exercise of the powers conferred under sub-section (*2*) of section 37 of the said Act and all other powers enabling it in that behalf, the State Government hereby sanctions the Proposed Modification with condition as described below :-

"In the Schedule of modifications appended with the said Notification, after the last entry, the following new entry shall be inserted *viz*. :-

*ENTRY*

" *The nomeclature of the " Site No.5-Bus Station " in the sanctioned Development Plan of Sector-8 of Thane City, is changed to " Play Ground " subject to following condition.*"

***Condition.–*** " *As the S.No.99 (pt) of Village Kalwa is in the possession of Court Receiver, the decision of the Hon'ble Court regarding this land will be final.*"

**2.** The date of publication of this Notification in the *Maharashtra Government Gazette* is fixed as the date of coming into force of this sanctioned modification.

**3.** The Part Plan of aforesaid sanctioned modification shall be made available for inspection by the general public during office hours on all working days at the following offices for a period of one month :—

(*i*) The Commissioner, Thane Municipal Corporation, Thane.

(*ii*) The Joint Director of Town Planning, Konkan Division, Konkan Bhavan, Navi Mumbai.

(*iii*) The Assistant Director of Town Planning, Thane Branch, Thane.

**4.** This notification shall also be made available on the Government Website at *www.maharashtra.gov.in*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. M. SHINDE,
Section Officer.

## नगरविकास विभाग

४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ फेब्रुवारी २०२३

### अधिसूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक-टिपीएस-१२१९/११६०/प्र.क्र.१२/२२/नवि-१२.— ज्याअर्थी, ठाणे शहराची सुधारित विकास योजना (यापुढे जिचा उल्लेख " उक्त विकास योजना " असा करण्यात आला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) च्या कलम ३१(१) अन्वये शासन नगरविकास विभागाची अधिसूचना क्रमांक टिपीएस-१२९७/१३१९/प्र.क्र.१४८/९७/नवि-१२, दिनांक ४ ऑक्टोबर १९९९ (यापुढे जिचा उल्लेख " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) अन्वये भागशः मंजूर झाली असून, ती दिनांक २२ नोव्हेंबर १९९९ पासून अंमलात आली आहे आणि उक्त विकास योजनेच्या वगळलेल्या भागाची विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम ३१(१) मधील तरतुदीनुसार शासन, नगरविकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-१२०१/२७४/प्र.क्र.२८/२००९/नवि-१२, दिनांक ३ एप्रिल २००३ रोजी मंजूर झाली असून दिनांक १४ मे, २००३ पासून अंमलात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेच्या सेक्टर-३ च्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे पाचपाखाडी ता.जि.ठाणे येथील स.नं.१५६(पै) व स.नं.१५७(पै.) चे ३७०० चौ.मी. क्षेत्र (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे.) म्हाडा वसाहत/बेघरांसाठी घरे यामध्ये समाविष्ट आहेत. (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त विकास योजना प्रस्ताव " असा करण्यात आला आहे.) ;

आणि ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिकेने (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त महानगरपालिका " असा करण्यात आला आहे) उक्त अधिनियमातील कलम ३७(१) अन्वयेची सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून उक्त जमीन उक्त विकास योजना प्रस्तावामधून वगळून सार्वजनिक पार्किंग याकरिता आरक्षित करण्याचा फेरबदल प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी दिनांक ३ एप्रिल २०१९ च्या पत्रान्वये सादर केला आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख " प्रस्तावित फेरबदल " असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर व संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर प्रस्तावित फेरबदल काही बदलासह मंजूर करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे ;

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम ३७ चे पोट-कलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने शासनास प्राप्त असलेल्या इतर अधिकारांचा वापर करून शासन उक्त विकास योजनेतील प्रस्तावित फेरबदल काही बदलासह मंजूर करीत आहे आणि त्यासाठी उक्त विकास योजना मंजुरीच्या अधिसूचनेतील फेरबदलाच्या अनुसूचीमध्ये शेवटच्या नोंदीनंतर पुढील नवीन नोंद समाविष्ट करण्यात येत आहे ;

### नोंद

" विकास योजना भाग नकाशात दर्शविल्याप्रमाणे, ठाणे शहराच्या मंजूर विकास योजना सेक्टर क्र.३, मौजे पाचपाखाडी, ता.जि.ठाणे येथील स.नं.१५६(पै) व स.नं.१५७(पै.), क्षेत्र सुमारे ३७०० चौ.मी. ही जमीन " म्हाडा वसाहत/बेघरांसाठी घरे " या मधून वगळून " आ.क्र.१अ-सार्वजनिक पार्किंग " याकरिता आरक्षित करण्यात येत आहे. सदर आरक्षणांकरिता ठाणे महानगरपालिका व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण संयुक्त समुचित प्राधिकरण राहील. "

२. सदरचा मंजूर फेरबदल ही अधिसूचना **शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनाकांपासून अंमलात येईल.

३. उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी खाली नमूद कार्यालयामध्ये एक महिन्याच्या कालावधीकरिता उपलब्ध करण्यात यावी.

(१) आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

(२) सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

(३) सहायक संचालक, नगररचना, ठाणे शाखा, जि. ठाणे.

४. सदर फेरबदलाची अधिसूचना ही महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर देखील उपलब्ध करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पु. म. शिंदे,**
कार्यासन अधिकारी.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

4th Floor, Main Building, Mantralaya, Mumbai 400 032, dated 7th February, 2023.

*NOTIFICATION*

Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

No. TPS-1219/1160/C.R.12/22/UD-12.— Whereas, the Revised Development Plan of the city of Thane (hereinafter referred to as " the said Development Plan ") has been sanctioned partly by the Government in the Urban Development Department, under section 31(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as " the said Act ") *vide* Notification No. TPS-1297/1319/CR-148/97/UD-12, dated the 4th October, 1999 (hereinafter referred to as " the said Notification ") and has come into force with effect from 22nd November 1999 and the Excluded Part of the said Development Plan has been sanctioned by the Government in Urban Development Department under section 31(*1*) of the said Act, *vide* Notification No. TPS-1201/274/CR-28/2009/UD-12, dated the 3rd April, 2003 and has come into force with effect from 14th May 2003 ;

And whereas, in the said Development Plan of Sector-3, land bearing S.No.156(pt) and 157(pt) of village Panchpakhadi, Tal and Dist Thane (hereinafter referred to as "the said land") is included in " MHADA Housing/Housing for Dishoused " (hereinafter referred to as "the said Development Plan proposal") ;

And whereas, Thane Municipal Corporation (hereinafter referred to as " the said Municipal Corporation"), after following the legal procedure under sub-section (*1*) of Section 37 of the said Act, has submitted a proposal for modification in the said Development Plan so as to delete the said land from the said Development Plan proposal and to reserve the same for " Public Parking " to the Government, *vide* letter dated 3rd April 2019 (hereinafter referred to as " the Proposed Modification") ;

And whereas, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that it is necessary to sanction the Proposed Modification with some changes.

Now therefore, in exercise of the powers conferred under sub section (*2*) of Section 37 of the said Act and all other powers enabling it in that behalf, the State Government hereby sanctions the Proposed Modification with some changes as described below :—

"In the Schedule of modifications appended with the said Notification, after the last entry, the following new entry shall be inserted *viz*. :—

*ENTRY*

" An area admeasuring approx.3700.00 sq.mt. of the land bearing S.No.156(pt) and 157(pt) of village Panchpakhadi, Tal. and Dist. Thane is deleted from " MHADA Housing/Housing for Dishoused " and land so deleted is reserved for " Site No.1A-Public Parking " as shown on the part plan of the Development Plan. The Appropriate Authority for this reservation is Thane Municipal Corporation and Mumbai Metropolitan Region Development Authority jointly."

2. The date of publication of this Notification in the *Maharashtra Government Gazette* is fixed as the date of coming into force of this sanctioned modification.

3. The Part Plan of aforesaid sanctioned modification shall be made available for inspection by the general public during office hours on all working days at the following offices for a period of one month :—

(*i*) The Commissioner, Thane Municipal Corporation, Thane.

(*ii*) The Joint Director of Town Planning, Konkan division, Konkan Bhavan, Navi Mumbai.

(*iii*) The Assistant Director of Town Planning, Thane Branch, Thane.

4. This notification shall also be made available on the Government Website at www.maharashtra.gov.in.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. M. SHINDE,
Section Officer.

## नगरविकास विभाग

४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ जानेवारी २०२३.

## अधिसूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक टिपीएस-१२२२/प्र.क्र.४६/२२/नवि-१२.— ज्याअर्थी, ठाणे शहराची सुधारित विकास योजना (यापुढे जिचा उल्लेख " उक्त विकास योजना " असा करण्यात आला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) च्या कलम ३१ (१) अन्वये शासन नगरविकास विभागाची अधिसूचना क्रमांक टिपीएस-१२९७/१३१९/ प्र.क्र.१४८/९७/ नवि-१२, दिनांक ४ ऑक्टोबर १९९९ (यापुढे जिचा उल्लेख " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) अन्वये भागशः मंजूर झाली असून, ती दिनांक २२ नोव्हेंबर १९९९ पासून अंमलात आली आहे आणि उक्त विकास योजनेच्या वगळलेल्या भागाची विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम ३१(१) मधील तरतुदीनुसार शासन, नगरविकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-१२०१/२७४/प्र.क्र.२८/२००९/नवि-१२, दिनांक ३ एप्रिल २००३ रोजी मंजूर झाली असून दिनांक १४ मे, २००३ पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेसाठी ठाणे महानगरपालिका हे नियोजन प्राधिकरण आहे (यापुढे जिचा उल्लेख " उक्त महानगरपालिका " असा करण्यात आला आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने ठराव क्र.११६, दिनांक ३० जुलै २०१३ अन्वये शिळफाटा ते दिवा रेल्वे स्टेशन असा ६०.०० मी. रुंद रस्त्याची आखणी उक्त विकास योजनेमध्ये दर्शविण्याचा ठराव पारित केला आहे व त्याकरिता उक्त विकास योजनेत उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) अन्वयेचा फेरबदल प्रस्ताव उक्त महानगरपालिकेने दिनांक १५ मे २०१५ च्या पत्रान्वये शासनाच्या मान्यतेकरिता सादर केला आहे (यापुढे ज्यांचा उल्लेख " प्रस्तावित फेरबदल " असा करण्यात आला आहे);

आणि ज्याअर्थी, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर व संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर, प्रस्तावित फेरबदलाच्या अनुषंगाने उक्त महानगरपालिकेने उक्त अधिनियमाचे कलम ३७(१) अन्वयेची वैधानिक कार्यवाही पूर्ण केलेली नसल्याने तो नामंजूर करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे.

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम ३७ चे पोट-कलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने शासनास प्राप्त असलेल्या इतर अधिकारांचा वापर करून शासन उक्त विकास योजनेतील प्रस्तावित फेरबदल नामंजूर करीत आहे.

२. सदर नामंजुरीची अधिसूचना नागरिकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी खालील नमूद कार्यालयांमध्ये एक महिन्याच्या कालावधीकरिता उपलब्ध करण्यात यावी.

(१) आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

(२) सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

(३) सहायक संचालक, नगररचना, ठाणे शाखा, जि. ठाणे.

३. नामंजुरीची प्रस्तुत अधिसूचना ही महाराष्ट्र शासनाच्या www. maharashtra.gov.in वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पु. म. शिंदे,**
कार्यासन अधिकारी.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

4th Floor, Main Building, Mantralaya, Mumbai 400 032, dated 9th January 2023.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. TPS-1222/C.R.46/22/UD-12.— Whereas, the Revised Development Plan of the City of Thane (hereinafter referred to as " the said Development Plan ") has been sanctioned partly by the Government in Urban Development Department, under Section 31(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as " the said Act ") *vide* Notification No. TPS-1297/1319/CR-148/97/UD-12, dated the 4th October 1999 (hereinafter referred to as " the said Notification ") and has come into force with effect from 22nd November 1999 and the Excluded Part of the said Development Plan has been sanctioned by the Government in Urban Development Department under Section 31(*1*) of the said Act, *vide* Notification No.TPS-1201/274/CR-28/2009/UD-12, dated the 3rd April 2003 and has come into force with effect from 14th May 2003 ;

And whereas, the Thane Municipal Corporation is the Planning Authority for the said Development Plan (hereinafter referred to as " the said Municipal Corporation ") ;

And whereas, the said Municipal Corporation *vide* its General Body Resolution No. 116, dated 30th July 2013 has resolved to earmark the alignment of 60.00 mt. wide Development Plan Road from Shilphata to Diva Railway Station in the said Development Plan, under section 37(*1*) of the said Act, and has submitted a proposal for such modification to the Government for its sanction *vide* its letter dated 15th May 2015 (hereinafter referred to as " the Proposed Modification ");

And whereas, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, it is revealed that the said Municipal Corporation has not completed the legal procedure as stipulated under section 37(*1*) of the said Act and hence, the Government is of the opinion that, the Proposed Modification needs to be rejected.

Now therefore, in exercise of the powers conferred under sub-section (*2*) of Section 37 of the said Act and all other powers enabling it in that behalf, the State Government hereby refuses to accord sanction to the Proposed Modification ;

2. This notification shall be made available for inspection by the general public during office hours on all working days at the following offices for a period of one month :—

(*i*) The Commissioner, Thane Municipal Corporation, Thane.

(*ii*) The Joint Director of Town Planning, Konkan Division, Konkan Bhavan, Navi Mumbai.

(*iii*) The Assistant Director of Town Planning, Thane Branch, Thane.

3. This notification shall also be made available on the Government Website at www.maharashtra.gov.in

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. M. SHINDE,
Section Officer.

## पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांजकडून

**वाचले.—** १. पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१ यांचेकडील पत्र क्रमांक पो.उप आयुक्त/परि-०१/गोपनीय/CRPC-144/120/2023, दिनांक ०९/०१/२०२३.

२. पोलीस उप आयुक्त परिमंडळ-२ यांचेकडील पत्र क्रमांक पोउआ परि-२/CRPC-144/७८/२०२३, दिनांक ०७/०१/२०२३.

३. पोलीस उप आयुक्त परिमंडळ-३ यांचेकडील पत्र क्रमांक पोउआ परि-३ विरार/CRPC-144/84/2023, दिनांक १०/०१/२०२३.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ (१) (२) प्रमाणे.

### मनाई आदेश

क्रमांक सु.शा./ड्रोन/मनाई आदेश/२०२३-१०१.— ज्याअर्थी, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात दहशतवादी व समाजविघातक कृत्य करणाऱ्या घटकांकडून Drone, Para Gliders, Remote Controlled Micro light Aircraft च्या सहाय्याने हल्ला करून मानवी जीवितास, आरोग्यास, संरक्षणास बाधा निर्माण करण्याची तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

ज्याअर्थी, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील मर्मस्थळे व संवेदनशील व संरक्षित ठिकाणांचे दहशतवादी व समाज विघातक कृत्य करणाऱ्या घटकांकडून Drone, Para Gliders, Remote Controlled Micro light Aircraft, arial missiles इ.च्या सहाय्याने निरीक्षण व रेकी करून घातपाती कारवाई करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

ज्याअर्थी, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे तथा संरक्षणाच्या अनुषंगाने अशा प्रकारच्या Drone, Para Gliders, Remote Controlled Micro light Aircraft, arial missiles यांचेवर नियमन व नियंत्रण करण्यासाठी प्रतिबंधकात्मक निर्बंध घालणे गरजेचे आहे.

त्याअर्थी, मी प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ (१) (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात " Drone, Para Gliders, Remote Controlled Micro light Aircraft, arial missiles " ज्यामुळे मानवी जीवितास आरोग्यास, संरक्षणास बाधा निर्माण करण्याची तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करण्याची शक्यता आहे अशा "Drone, Para Gliders Remote Controlled Micro light Aircraft, arial missiles " चा वापर यावर मनाई करीत आहे. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिसांकडून करण्यात येणाऱ्या हवाई सर्वेक्षणास व मा.पोलीस आयुक्त यांचेकडून विशेष परवानगीने करण्यात येणाऱ्या वापरास सदर मनाई आदेशातील तरतुदी लागू असणार नाहीत.

जो कोणी सदर मनाई आदेशाचा भंग करेल तो इसम भा.दं.वि.स कलम १८८ प्रमाणे शिक्षेस पात्र ठरेल. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम १६३ प्रमाणे सदरचा आदेश सार्वजनिक जागी प्रसिद्ध करण्यात येत आहे. तसेच मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये सदर आदेशाच्या प्रती स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिद्ध करावा. सदर मनाई आदेशाने प्रभावित होणाऱ्या व्यक्तींना स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ (१) (२) अन्वये सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसारमाध्यमे, संबंधित पोलीस स्टेशन, सहा. पोलीस आयुक्त तसेच परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांचे कार्यालयातील नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सदर आदेशाचा कालावधी हा दिनांक २१/०१/२०२३ रोजी २३.०० पासून ते दिनांक २०/०३/२०२३ रोजी २४.०० वाजेपावेतो लागू राहील.

सदरचा आदेश माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक २१/०१/२०२३ रोजी दिलेला आहे.

**प्रकाश गायकवाड,**
पोलीस उप आयुक्त, (मुख्यालय)
मिरा-भाईंदर, वसई-विरार.

## नगरविकास विभाग

४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३.

### अधिसूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक टिपीएस-१२२१/७९३/प्र.क्र.३०/२१/नवि-१२.—ज्याअर्थी, शासनाने नगरविकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-१४९०/प्र.क्र.३६५/९०/नवि-१२, दिनांक ४ जुलै, १९९२ (यापुढे जिचा उल्लेख " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) अन्वये रायगड प्रदेशाची प्रादेशिक योजना (यापुढे जिचा उल्लेख " उक्त प्रादेशिक योजना " असा करण्यात आला आहे), महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १५ ( यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) अन्वये मंजूर केली असून ती दिनांक १५ सप्टेंबर, १९९२ पासून अंमलात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेच्या पेण-पनवेल-खालापूर परिसर विकास केंद्रातील प्रस्तावानुसार मौ. खानाव, ता. खालापूर येथील ग.नं. १४६, १४७, १५२, १५७ ते १६६, १६८, १७३ ते १७५, १७८ ते १८१, १८४ ते १८७, १९० ते १९९, २०१, २०२, २१२, २१४, २१५, २१६, २२४ ते २४८, २५० ते २५३, २७६ ते ३०५, ३०७, ३१०, ३१५, ३१६, ३१८, ३१९, ३२२, ३२३, ३२५ या जमिनी शेती विभागात समाविष्ट आहेत. (यापुढे ज्यांचा उल्लेख ' उक्त जमिनी ' असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनी शेती विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्याची विनंती श्री. कपिल बागला, मे. वॉकवॉटर प्रॉपर्टीज प्रा.लि. यांनी शासनास दिनांक १ सप्टेंबर २०२० च्या पत्रान्वये केली आहे (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अर्जदार " असा करण्यात आला आहे.) ;

आणि ज्याअर्थी, उक्त अर्जदार यांची विनंती विचारात घेऊन तसेच आवश्यक ती चौकशी केल्यानंतर शासनाने उक्त जमिनी शेती विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्याबाबतची उक्त अधिनियमाच्या कलम २०(३) ची सूचना क्रमांक टिपीएस-१२२१/७९३/प्र.क्र.३०/२१/नवि-१२, दिनांक ४ मे २०२१ रोजी आम जनतेकडून हरकती/ सूचना मागविण्यासाठी प्रसिद्ध केली आहे, जी **शासन राजपत्रात** दिनांक २० ते २६ मे,२०२१ रोजी पृ. क्र. ३० ते ३२ वर प्रसिद्ध झाली आहे. तसेच सदर सूचनेस शद्धीपत्रक क्रमांक टिपीएस-१२२१/७९३/ प्र.क्र.३०/२१/ शद्धीपत्रक/ नवि-१२, दिनांक २४ नोव्हेंबर २०२१ रोजी निर्गमित करण्यात आले असून, सदरचे शद्धीपत्रक **शासन राजपत्रात** दिनांक २ ते ८, डिसेंबर, २०२२ रोजी पृष्ठ क्र. ३५ व ३६ वर प्रसिद्ध झाले आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख " प्रस्तावित फेरबदल " असा करण्यात आला आहे) आणि प्रस्तावित फेरबदलाच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या हरकती/किंवा सूचनांवर सबंधिताना सुनावणी देऊन अहवाल शासनास सादर करणेकरिता सह संचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांची अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे (यापुढे ज्यांचा उल्लेख " उक्त अधिकारी " असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित फेरबदलाखालील उक्त जमिनींपैकी काही जमिनी उक्त अर्जदार यांच्या ताब्यात / मालकीच्या नाहीत आणि ज्या जमिनी उक्त अर्जदार यांच्या मालकीच्या नाहीत, त्या जमिनीच्या वापर बदलाकरिताचे अधिमुल्य भरणार असल्याचे उक्त अर्जदार यांनी दिनांक २२ जानेवारी २०२१ च्या पत्रान्वये शासनास कळविले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिकारी यांचा अहवाल विचारात घेतल्यानंतर व संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर तसेच आवश्यक ती चौकशी केल्यानंतर प्रस्तावित फेरबदल अटींसापेक्ष अंतिमतः मंजूर करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासन निर्णय दिनांक ४ जानेवारी २०१६ मधील तरतुदीनुसार उक्त अर्जदार यांनी प्रस्तावित फेरबदलाखालील सर्व जमिनीच्या वापर बदलाकरिता प्रचलित वार्षिक मुल्यदर तक्त्यानुसार येणाऱ्या जमीन मुल्याच्या ३०% दराने येणाऱ्या अधिमुल्याची रक्कम रुपये २,२५,२५,९००/- (अक्षरी रुपये दोन कोटी पंचवीस लक्ष, पंचवीस हजार नऊशे फक्त) सहायक संचालक नगररचना, रायगड अलिबाग शाखा यांचेमार्फत शासकीय कोषागारात चलन क्रमांक MH014517347202223M दिनांक ३० जानेवारी २०२३ (डीफेस क्रमांक ०००७४१३ ६५५२०२२२३, दिनांक ७ फेब्रुवारी २०२३ ) रोजी भरणा केला आहे.

त्याअर्थी आता, शासन उक्त अधिनियमाच्या कलम २०(४) मधील तरतुदीनुसार व अन्य तरतुदीनुसार प्राप्त असलेल्या अधिकारान्वये प्रस्तावित फेरबदलास अटीसापेक्ष मंजुरी देत आहे आणि त्यासाठी उक्त प्रादेशिक योजना मंजुरीच्या दिनांक ४ जुलै १९९२ च्या अधिसूचनेतील फेरबदलाच्या अनुसूचिमध्ये शेवटच्या नोंदीनंतर खालील नवीन नोंद समाविष्ट करण्यात येत आहे.

**नोंद**

" प्रादेशिक योजना भाग नकाशावर दर्शविल्याप्रमाणे मौ.खानाव, ता.खालापूर येथील ग.नं.१४६, १४७, १५२, १५७ ते १६६, १६८, १७३ ते १७५, १७८ ते १८१, १८४ ते १८७, १९० ते १९९, २०१, २०२, २१२, २१४, २१५, २१६, २२४ ते २४८, २५० ते २५३, २७६ ते ३०५, ३०७, ३१०, ३१५, ३१६, ३१८, ३१९, ३२२, ३२३, ३२५ या जमिनी नियमानुसार सोडाव्या लागणाऱ्या १०% सुविधा क्षेत्रापैकी ५०% क्षेत्र खुल्या स्वरुपाच्या सुविधा जसे क्रिडांगण, बगिचा, इत्यादीसाठी ठेवण्याच्या अटीसापेक्ष शेती विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहेत."

२. उक्त मंजूर फेरबदल १ (एक) महिन्याच्या कालावधीसाठी खालील नमूद कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेमध्ये सर्वसामान्य जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध राहिल.

(१) सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

(२) जिल्हाधिकारी, रायगड.

(३) सहायक संचालक, नगररचना, रायगड-अलिबाग शाखा, जि. रायगड.

३. सदरची अधिसूचना ही विभागाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पु. म. शिंदे,**
कार्यासन अधिकारी.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

4th Floor, Main Building, Mantralaya, Mumbai 400 032, dated 16th February 2023.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. TPS-1221/793/C.R. 30/21/UD-12.—Whereas, the Government has sanctioned the Regional Plan for the Raigad Region (hereinafter referred to as " the said Regional Plan ") *vide* Notification No.TPS-1490/CR-365/90/UD-12, dated the 4th July 1992 as per the provisions of Section 15 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as " the said Act ") which has come into force with effect from 15th September 1992 ;

And whereas, as per the proposal of the Growth Centre of Pen-Panvel-Khalapur Surrounding area of the said Regional Plan, lands bearing Gut Nos. 146, 147, 152, 157 to 166, 168, 173 to 175, 178 to 181, 184 to 187, 190 to 199, 201, 202, 212, 214, 215, 216, 224 to 248, 250 to 253, 276 to 305, 307, 310, 315, 316, 318, 319, 322, 323, 325 of Village Khanav, Tal. Khalapur are included in Agriculture Zone (hereinafter referred to as " the said lands ") ;

And whereas, Shri. Kapil Bagla, M/s Walkwater Properties Pvt. Ltd. has requested Government to delete the said lands from Agriculture Zone and to include the same in Residential Zone *Vide*, letter dated 1st September 2020 (hereinafter referred to as " the said Applicant ") ;

And whereas, considering the request of the said Applicant and after making necessary enquiries, Government has issued a notice No. TPS-1221/793/ CR.30/21/UD-12, dated the 4th May, 2021, regarding the change of zone of the said lands from Agriculture Zone to Residential Zone under section 20(3) of the said Act, which appeared in *Maharashtra Government Gazette* on 20-26 May,2021 at pages 30 to 32 & Corrigendum to this notice No. TPS-1221/793/CR.30/21/ Corrigendum/ UD-12, dated the 24th November, 2021, which appeared in *Maharashtra Government Gazette* on 2-8 December, 2021 at pages 35 & 36 (hereinafter referred to as " the Proposed Modification ") and appointed the Joint Director of Town Planning, Konkan Division, Konkan Bhavan, Navi Mumbai as an officer to hear the suggestion/or objections which may received and submit his report to the Government (hereinafter referred to as " the said officer ") ;

And Whereas, out of the total area of the said lands under the Proposed Modification, the said Applicant is not having the possession / ownership of the some lands and the said Applicant *vide* letter dated 22nd January 2021 has informed Government that the premium for the change of zone of lands, which are not owned by the said Applicant will be paid by him ;

And Whereas, considering the report of the said officer and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune and also making necessary enquiries, the Government is of the opinion that it is necessary to finally sanction the Proposed Modification with condition ;

And whereas, as per Government Resoulation dated 4th January 2016 the said Applicant have deposited the premium amount of Rs.2,25,25,900/- (Rs. Two Crore Twenty Five Lakhs Twenty Five Thousands Nine Hundred only) towards the change of zone payble to Government in the Government treasury through Assistant Director of Town Planning, Raigad-Alibaug Branch *vide* challan No. MH014517347202223M, dated 30th January 2023 (Defacement No. 0007413655202223, dated 7th February 2023) as per the rate prescribed in the current Annual Statement of Rates.

Now therefore, in exercise of the powers confferred under sub-section (*4*) of section 20 of the said Act, the Government hereby, finally sanctions the Proposed Modification with condition and for that purpose amends the notification dated 23rd September 1999 sanctioning the said Regional Plan by inserting the following new entry after the last entry.

*ENTRY*

" The lands from village Khanav, Tal. Khalapur, Dist. Raigad bearing Gut Nos. 146, 147, 152, 157 to 166, 168, 173 to 175, 178 to 181, 184 to 187, 190 to 199, 201, 202, 212, 214, 215, 216, 224 to 248, 250 to 253, 276 to 305, 307, 310, 315, 316, 318, 319, 322, 323, 325 are deleted from Agriculture Zone and included in Residential Zone subject to the condition that the 10% area to be kept for amenity space as per the regulation, out of that amenity 50% is to be kept for the open amenities such as Play Ground, Garden etc. as shown on the part plan of Regional Plan. "

2. The sanctioned modification shall be kept for inspection of the general public during office hours on all working days at the following offices for the period of 1 (one) month :—

(1) The Joint Director of Town Planning, Konkan Division, Konkan Bhavan, Navi Mumbai.

(2) The Collector, Raigad.

(3) The Assistant Director of Town Planning, Raigad-Alibaug Branch, Raigad.

3. This notification shall also be available on the Government web site *www.maharashtra.gov.in*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. M. SHINDE,
Section Officer.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.